| | | | |
|---|---|---|---|
| MHST160013432024 | दाखल दिनांक | : | १३.१२.२०२४. |
| | नोंदणी दिनांक | : | १३.१२.२०२४. |
| | निकाल दिनांक | : | ०५.०८.२०२६. |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस.<br>०१ ०७ २३ |

***भाग अ***

**प्रथमवर्ग न्यायदंडधिकारी यांचे न्यायालयात, वाई.**
तालुका- वाई, जिल्हा- सातारा.
(पिठासिन अधिकारी श्रीमती एस. आर. शिंदे)
**समरी फौजदारी खटला क्रमांक ७०५/२०२४.**
**निशाणी क्र.१६.**

गुन्हा रजिस्टर नं.२०२ सन २०२४ दिनांक २९.०६.२०२४ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२(अ) अन्वये, वाई पोलिस स्टेशन, ता.वाई. जि.सातारा.

| | |
|---|---|
| फिर्यादी | **महाराष्ट्र सरकार**<br>पोलीस निरीक्षक,<br>वाई पोलिस स्टेशन, ता. वाई, जि.सातारा. |
| प्रतिनिधीत्व | श्री. एस. आर. महाडीक, सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| आरोपी | **महंम्मद अश्रफ मुजावर.**<br>वय- ३४ वर्षे, धंदा- मजूरी,<br>रा.२१२२, फुलेनगर, ता.वाई, जि.सातारा. |
| प्रतिनिधीत्व | श्री. एम.एस.बागवान आरोपी तर्फे विधीज्ञ. |

***भाग ब***

| | |
|---|---|
| घटनेचा दिनांक | २९.०६.२०२४. |
| प्रथम फिर्याद दिल्याचा दिनांक | २९.०६.२०२४. |
| दोषारोपाचा दिनांक | १८.०९.२०२४. |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०७.०३.२०२५. |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | १९.०९.२०२५. |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | लागू नाही. |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०५.०८.२०२६. |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, जर असेलतर. | लागू नाही. |

## *आरोपीची माहिती.*

| आरोपीचा दर्जा | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सुटल्याचा दिनांक | दोषारोपाचे कलम | काय निर्दोष सोडण्यात आले किंवा शिक्षा केली. | शिक्षा ठोठावली. | खटला सुरु असताना कलम ४२८ फौ.प्र.स. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | महंम्मद अश्रफ मुजावर | फौ.प्र. सं. कलम ४१(अ) प्रमाणे नोटीस दिली. | दिनांक ०७.०३.२०२५ | महाराष्ट्र जुगार प्रति. कायदा कलम १२(अ). | निर्दोष मुक्त केले. | नाही. | नाही. |

## *भाग क*
## *सरकारी पक्ष /बचाव पक्ष /न्यायालयीन साक्षीदार*

### अ. सरकार पक्ष

| क्रमवारी | नांव | पुराव्याचे स्वरूप<br>प्रत्यक्ष साक्षीदार/पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार,वैद्यकिय साक्षीदार,पंच साक्षीदार. |
|---|---|---|
| १ | राकेश शांताराम गाढवे. | घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार. |
| २ | स्नेहल गोरख सोनावणे. | फिर्यादी. |

### ब. बचाव पक्ष, जर असेल तर: लागू नाही.

| क्रमवारी | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| १. | लागू नाही. | लागू नाही. |

### क. न्यायालयीन साक्षीदार, जर असेल तर: लागू नाही.

| क्रमवारी | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| १. | लागू नाही. | लागू नाही. |

## *सरकारी पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांनी दिलेल्या निशाण्या*

### अ. सरकार पक्ष

| अ.क्र. | निशाणी नंबर | वर्णन |
|---|---|---|
| **१.** | सा.क्र.१/निशाणी १०. | घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील सही. |
| **२.** | सा.क्र.२/निशाणी १३. | फिर्याद |

### ब. बचाव पक्ष आणि
### क. न्यायालयीन निशाणीः लागू नाही.

| अ.क्र. | निशाणी नंबर | वर्णन |
|---|---|---|
| १. | लागू नाही. | लागू नाही. |

### ड. भौतिक आक्षेपः लागू नाही.

| अ.क्र. | भौतिक आक्षेप क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | लागू नाही. | लागू नाही. |

## - न्यायनिर्णय -

(अधिघोषित दिनांक ०५.०८.२०२६)

सदरचा खटला हा आरोपीविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२(अ) प्रमाणे दाखल झालेला आहे.

### अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे -

**०२.** फिर्यादीचे कथनानुसार, दिनांक २९.०६.२०२४ रोजी १८.१५ वाजणेच्या सुमारास मौजे फुलेनगर नाका, जनसेवा टपरीचे शेजारी पत्र्याचे शेडमध्ये आरोपी महंम्मद अश्रफ मुजावर हा बेकायदा बिगरपरवाना स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता लोकांचेकडून पैसे स्वीकारून कल्याण नावाचा मटका चालवित असताना त्याचे कब्जात र.रु.२०८०/- व जुगाराचे साहित्य बाळगून मिळून आला.त्यामुळे, फिर्यादीने आरोपीविरूध्द वाई पोलिस ठाणे येथे फिर्याद दाखल केली.

**०३.** फिर्यादी श्रीमती स्नेहल गोरख सोनावणे, पोलिस कॉस्टेबल यांच्या फिर्यादीवरून पोलिस ठाणे वाई येथे गुन्हा रजिस्टर नंबर २०२/२०२४ हा महाराष्ट्र जुगार अधिनियम कलम १२(अ) अन्वये दाखल केला. त्यानंतर गुन्ह्याचा पुढील तपास तपासिक अधिकारी पोलीस हवालदार श्री. डी.एस.यादव यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष पंचनामा केला तसेच साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. तपासाअंती आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांनी आरोपीविरुध्द न्यायालयात महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२(अ) अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर नि.क्र.६ वर महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२(अ) प्रमाणे दोषारोप निश्चित केले. सदरचे दोषारोप आरोपीस त्याचे मातृभाषेतून वाचून व समजावून सांगितले. सदरचे दोषारोप त्याने नाकबूल करुन खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

**०५.** आरोपीविरूध्द गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आल्याने मी आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नि.क्र.१५ वर नोंदविण्यात आले.

आरोपीने त्याच्या विरूध्द खोटी केस केली आहे असा बचाव घेतला. त्यामुळे, आरोपीचा पुरावा संपुर्ण नकारात्मक आहे.

**०६.** सरकारतर्फे विद्वान सरकारी वकील श्री. एस. आर. महाडीक आणि आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एम.एस.बागवान यांचा युक्तीवाद ऐकला.

**०७.** दोन्ही पक्षांचे कथनावरुन व अभिलेखावरील दाखल कागदपत्रांवरुन माझेपुढे खालील मुद्दे उपस्थित झाले आणि त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविणेत आलेले आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, दिनांक २९.०६.२०२४ रोजी मौजे फुलेनगर नाका, ता.वाई येथील जनसेवा टपरीचे शेजारी पत्र्याचे शेडमध्ये, सार्वजनिक ठिकाणी, आरोपी हा स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता, बेकायदा, बिगरपरवाना, लोकांचेकडून पैसे स्वीकारून कल्याण नावाचा जुगार चालवित असताना मिळून आला त्यामुळे त्याने महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२(अ) प्रमाणे अपराध केला ? | **......नाही.** |
| २. | अंतिम आदेश ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करणेत येत आहे.** |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. १ करीता</u>-**

०८. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ राकेश शांताराम गाढवे हा सरतपासात सांगतो की, दिनांक २९.०६.२०२४ रोजी त्याला फुलेनगर नाका येथे पोलीसांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलविले नव्हते. पोलिसांनी त्याचे समक्ष काहीही जप्त केले नव्हते. पोलीसांनी त्याच्यासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला नव्हता. पोलिसांनी त्याची एका

कागदावर सही घेतली होती. सदर साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र.२ वर सही असून त्यातील मजकूराबाबत त्यांना माहिती नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदार हा अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने त्याला सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये उलटतपासाचे स्वरूपात काही प्रश्न विचारले. परंतु, त्याचे उलटतपासातूनही आरोपीचे विरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे, सदर साक्षीदाराच्या साक्षीवरून आरोपीच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त केला याबाबत साशंकता निर्माण होत आहे.

०९. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.२ फिर्यादी श्रीमती स्नेहल गोरख सोनावणे यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, दिनांक २९.०६.२०२४ रोजी त्या वाई पोलिस स्टेशन येथे पोलिस कॉस्टेबल या पदावर कार्यरत असताना, खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मौजे फुलेनगर येथील एका पत्र्याच्या शेडमध्ये एक इसम कल्याण मटका नावाचा जुगार खेळत आहे. त्यावेळी त्यांना वरिष्ठांनी घटनास्थळी जावून छापा टाकण्याचे कळविले. सा.क्र.२ फिर्यादी श्रीमती स्नेहल सोनावणे यांनी सरतपासात सांगितले की, त्यानंतर फिर्यादी, पी.एस.आय. चव्हाण, पो.ह. गहिन, पो.ह. जाधव असे खाजगी वाहनाने घटनास्थळी गेले. त्यावेळी त्यांना त्याठिकाणी एक व्यक्ती पेनाने आकडे लिहित होती व दुसरे दोघेजण त्याचेसमोर उभे होते. त्यांनी त्यापैकी एका व्यक्तीस पकडले असता दुसरे दोघेजण घटनास्थळावरून पळून गेले. त्या व्यक्तीची अंगझडती घेतली असता त्याचेकडे रोख रक्कम रुपये २०८०/-, एक पेन व कागदी स्लीप मिळाली. त्यानंतर त्यांनी घटनास्थळावर घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. त्यानंतर फिर्यादीने पोलीस स्टेशनला जावून घटनेबाबतची फिर्याद दिली. फिर्यादीने फिर्यादीवरील त्याची सही ओळखली असून नि.क्र.१३ वरील फिर्यादमधील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले आहे.

१०. सा.क्र.२ श्रीमती स्नेहल सोनावणे यांनी मान्य केले की, एखादी व्यक्ती मटका खेळत असेल तर दुस-या व्यक्तीने त्या मटक्यावर पैसे लावावे लागतात. फिर्यादी उलटतपासात मान्य करतात की, मटका जुगार पूर्ण होण्यासाठी तीन व्यक्तिंची गरज लागते. फिर्यादी सा.क्र.२

श्रीमती स्नेहल सोनावणे उलटतपासात मान्य करतात की, एखाद्या व्यक्तीने दुकानातून एखादे बील घेतले असता त्यावर आकडे असू शकतात. फिर्यादी उलटतपासात महत्त्वाची बाब मान्य करतात की, एखाद्या व्यक्तीकडे पेन व रोख रक्कम सहजपणे उपलब्ध होवू शकते. सा.क्र.२ श्रीमती स्नेहल सोनावणे उलटतपासात मान्य करतात की, घटनास्थळ हे कोणाच्या मालकीचे आहे हे त्या सांगू शकत नाहीत. फिर्यादी उलटतपासात मान्य करतात की, त्यांनी घटनास्थळाचा सातबारा उतारा पाहिलेला नव्हता. फिर्यादी सा.क्र.२ श्रीमती स्नेहल सोनावणे उलटतपासात मान्य करतात की, घटनास्थळाच्या आजुबाजूला दुकाने व घरे आहेत. फिर्यादी उलटतपासात मान्य करतात की, फिर्यादीत पंचांची नावे नमूद केलेली नाहीत.

**११.** साक्षीदार क्र. २ श्रीमती स्नेहल सोनावणे यांनी साक्षीपुराव्यात नि.क्र.१३ वरील फिर्यादमधील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले आहे. परंतु सदर साक्षीदाराच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता त्याने प्रस्तुत प्रकरणात घटनास्थळी छापा टाकण्यासाठी गेला असे दर्शविणारा स्टेशन डायरीचा उतारा दाखल केलेला नाही. त्याचप्रमाणे सा.क्र.२ श्रीमती स्नेहल सोनावणे यांनी उलटतपासात मान्य केलेल्या महत्त्वाच्या अनुषंगाने नि.क्र.१३ वरील फिर्यादीचे अवलोकन केले असता त्यामध्ये पंच साक्षीदारांची नावे नमूद केलेली नाहीत असे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे फिर्याद नि.क्र.१३ ही सदर साक्षीदार व इतर पोलीस कर्मचारी असे छापा टाकण्यासाठी निश्चित कोणत्या वाहनाने गेले होते त्या वाहनाचा क्रमांक देखील फिर्यादीत नमुद नसल्याचे स्पष्ट होते. तसेच फिर्यादीत घटनास्थळ हे निश्चित कोणाच्या मालकीचे आहे याबाबत देखील काहीही नमुद केलेले नाही. त्यामुळे सदर सा.क्र.२ श्रीमती स्नेहल सोनावणे व इतर पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळी छापा टाकला किंवा कसे याबाबत साशंकता निर्माण होते.

**१२.** त्याचप्रमाणे, घटनास्थळ हे रहदारीचे ठिकाण असल्याचे सदर सा.क्र.२ श्रीमती स्नेहल सोनावणे यांनी मान्य केलेले आहे. सदरची बाब विचारात घेता, घटनास्थळी आरोपी कल्याण नावाचा मटका जुगार चालवित होता ही घटना पाहण्याची संधी इतरही प्रत्यक्षदर्शी व स्वतंत्र साक्षीदार यांना पाहण्याची संधी होती. परंतु, अभियोग पक्षाने इतर कोणत्याही

प्रत्यक्षदर्शी व स्वतंत्र साक्षीदार यांची साक्ष अभिलेखावर नोंदविलेली नाही. साक्षीदार क्र.२ पो.कॉ. स्नेहल सोनावणे यांचे म्हणणेनुसार घटनास्थळावर मुद्देमाल मिळून आला, परंतु, प्रस्तुत प्रकरणात जप्ती पंचनामा पंच साक्षीदाराचे साक्षी पुराव्यातून सिध्द झालेला नाही. सा.क्र.२ श्रीमती स्नेहल सोनावणे यांनी उलटतपासात मान्य केलेल्या कथनावरून एखाद्या व्यक्तीकडे पेन व रोख रक्कम सहजपणे उपलब्ध होवू शकते. त्यामुळे या सर्व परिस्थितीचा विचार करता आरोपी हा त्याच्या कल्याण मटका नावाचा जुगार खेळत होता असे उपलब्ध साक्षीपुराव्यावरून निःसंशयपणे सिध्द होत नाही. एकंदर अभियोग पक्षाच्या खटल्याबाबत संशय निर्माण होतो. त्यामुळे, यासर्व बाबींचा आरोपीला संशयाचा फायदा देणे न्यायोचित होईल.

**१३.** साक्षीदार क्र.२ फिर्यादी श्रीमती स्नेहल सोनावणे यांनी दिलेल्या उलटतपासात मान्य केलेल्या कथनावरून व अभिलेखावर आलेला पुरावा एकत्रात विचारात घेता अभियोग पक्षास गुन्ह्याच्या तपासाकामी स्वतंत्र आणि निपक्ष साक्षीदार मिळून आलेले नाहीत. तसेच तपासी अधिकारी यांनी घटनास्थळावरील उपलब्ध प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा जबाब नोंदविण्याचा कुठलाही प्रयत्न केलेला दिसून येत नाही. वास्तविक पाहता, अभियोग पक्षाने घटनास्थळ हे कोणाच्या मालकीचे आहे हे दर्शविण्यासाठी त्याचा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर करणे आवश्यक होते. तसेच, घटनास्थळ हे मौजे फुलेनगर नाका, जनसेवा टपरीचे शेजारी पत्र्याचे शेडमध्ये, सार्वजनिक ठिकाणी होते हे सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने घटनास्थळ पंचनामा सिध्द करणे आवश्यक होते. परंतु जप्ती पंच साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या खटलयास मदत केलेली नसल्यामुळे सदर प्रकरणातील सर्वांत महत्वाचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा हा सिध्द झालेला नाही. त्यामुळे वरील सर्व नमूद बाबींचा विचार करता संशयाचा फायदा देणे योग्य होईल. त्यामुळे या सर्व कारणास्तव मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदविते.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>-**

**१४.** मुद्दा क्र.१ वरील मी नोंदविलेल्या निष्कर्षावरुन अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द सबळ पुरावा नोंदवून गुन्हा सिध्द केलेला नाही. त्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होणेस पात्र

आहे. सबब, मी मुद्दा क्र.२ चे निष्कर्षासाठी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**-आदेश-**

१. आरोपी महम्मंद अश्रफ मुजावर याची महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२(अ) अन्वये ठेवण्यात आलेल्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल रक्कम रूपये २०८०/-(अक्षरी रुपये दोन हजार ऐंशी मात्र) असे अपील कालावधी संपल्यानंतर सरकार जमा करण्यात यावी. प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक स्लीपबुक व एक निळे रंगाची रिफील असलेला निळे रंगाचा बॉलपेन हे मुल्यहीन असल्यामुळे त्यांचा अपिल कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ) प्रमाणे तरतुदीची पुर्तता करणेसाठी आरोपीने रक्कम रुपये २५,०००/- चे वैयक्तीक जातमुचलका तात्काळ सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात सांगून घोषित करणेत येतो.)

SHRIJA RAJENDRA SHINDE
Digitally signed by SHRIJA RAJENDRA SHINDE
Date: 2026.08.05 17:44:14 +0530

**वाई.** **( श्रीमती एस. आर. शिंदे )**

**दिनांक ०५.०८.२०२६.** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, वाई.**

**प्रमाणपत्र**

यान्द्वारे मी असे प्रतिपादन करतो की, वरील न्यायनिर्णय व त्याची तयार केलेली पी.डी.एफ. प्रत यातील सर्व मजकुर मुळ न्यायनिर्णयाशी तंतोतंत बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय दिनांक | : | ०५.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय स्वाक्षांकित दिनांक | : | ०५.०८.२०२६ |
| लघुलेखकाचे नाव | : | श्री. अक्षय. द. कुंभार<br>लघुलेखक (श्रेणी ३) |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | : | ०५.०८.२०२६ |